# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 14.02.2025** **वार- शुक्रवार**

---

**शुभाखोटे**

पूर्वी चित्रपटात विनोद हा नायक आणि नायिकेइतकाच महत्त्वाचा होता; आता मात्र विनोदाचे फक्त तुकडे जोडलेले असतात, असं मत ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. २३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यामध्ये काल शुभा खोटे यांना ‘पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड’ नं सन्मानित करण्यात आलं. त्यानंतर आज त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल आणि महोत्सवाच्या चित्रपट निवड समितीचे सदस्य समर नखाते यांनी त्यांच्याशी संवाद साधला. आपल्या नर्मविनोदी आणि खुमासदार शैलीत शुभा खोटे यांनी भारतीय चित्रपट सृष्टीच्या बदलत्या कार्यशैलीबद्दल भाष्य केलं. तसंच सिनेमाच्या सुवर्ण काळातल्या अनेक आठवणीही सांगितल्या.

**स्वच्छता**

स्वच्छता ही केवळ एका व्यक्तीची किंवा संस्थेची जबाबदारी नसून ती लोकचळवळ आहे; लोकांनी ठरवलं तर मुळा मुठा नदी नक्की स्वच्छ राहू शकते असा विश्वास पुणे महापालिकेच्या उपायुक्त आशा राऊत यांनी आज व्यक्त केला. My River My Valentine या संकल्पने अंतर्गत पुण्यात आज सकाळी स्वच्छता अभियान राबवण्यात आलं; त्यावेळी त्या बोलत होत्या. केंद्रीय संचार ब्यूरो, Worship Earth Foundation आणि पुणे महानगरपालिका, यांनी संयुक्तपणे या स्वछता अभियानाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय संचार ब्यूरोचे उपसंचालक निखिल देशमुख यांच्यासह विविध

स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, कलाकार, नेहरू युवा केंद्रासह NSS चे विद्यार्थी आणि नागरिक यामधे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

<u>पीएमपीएमएल</u>

पुणे शहर आणि परिसराचा विस्तार सातत्याने होत असून प्रवाशांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे  पीएमपीएमएलच्या ताफ्यात लवकरच एक हजार बस दाखल होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच मुंबईत पीएमआरडीए, पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पीएमपीएमएलच्या अध्यक्षांची बैठक घेऊन 1 हजार  बस तातडीने खरेदी करण्याच्या सूचना दिल्या होत्या, असं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितलं.

<u>प्रदूषण</u>

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापुढे सण उत्सवामध्ये प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मुर्तींवर पूर्णत: बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची पुणे महापालिकेच्यावतीने अंमलबजावणी करण्यात येणार असून पुणे शहरात यापुढे प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती बनवणं आणि नैसर्गिक जलस्त्रोतात त्यांचं विसर्जन करण्यावर पूर्णत: बंदी असेल. या मूर्तींचं विसर्जन कृत्रिम तलावातच करणं बंधनकारक असेल असे आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी काल दिले.

<u>pcmc</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाश चिन्ह आणि परवाना विभागाकडून दिला जाणारा जाहिरात फलकांचा परवाना, त्याची देखरेख आणि नियमनामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित प्रणाली महानगरपालिकेने सुरू केली आहे. अत्याधुनिक लेसर कॅमेरे बसवलेल्या विद्युत वाहनाद्वारे शहरातील सर्व जाहिरात फलकांचं सर्वेक्षण केलं जाणार आहे.

**प्रबोधनपर्व**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १५ ते १९ फेब्रुवारी  या कालावधीत ‘छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व’   या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. यामध्ये ‘शिवशंभू शौर्यगाथा’  या महानाट्यासह ‘शाहिरीतून शिवदर्शन’ , ‘सन्मान शिवरायांचा- रंग शाहिरी कलेचा’ , ‘काव्यमय समाज प्रबोधन’ , यासह व्याख्यानं, ‘ढोल वादन’ , शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, रक्तदान शिबीर असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

**कात्रजडेअरी**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या म्हणजे कात्रज डेअरीच्या अध्यक्षपदी  स्वप्नील ढमढेरे तर उपाध्यक्षपदी मारुती जगताप यांची निवड झाली आहे. या पदांसाठी कोणाचाही अर्ज न आल्याने सहकारी संस्था सहाय्यक निबंधक सुधीर खंबायत यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचं जाहीर केलं.

**खो-खो**

पुण्यात शालेय स्तरावर प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॅटवर खो खो स्पर्धा होणार आहेत. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि रमणबाग मित्र मंडळाच्या वतीनं उद्या आणि परवा या स्पर्धा घेण्यात येतील. आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा शालेय स्तरावर समावेश होणं हे महाराष्ट्रातील खो-खो क्षेत्रासाठी मोठं पाऊल मानलं जात आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३५ अंश तर किमान १३ पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.